**महापालिका सहाय्यक आयुक्त, शिवाजीनगर-घोलेरोड क्षेत्रिय कार्यालय, पुणे महानगरपालिका.**
कार्यालयाचा पत्ता : महात्मा फुले म्युझियम जवळ, शिवाजीनगर, पुणे.
कार्यालयाचा संपर्क क्र. : ०२०-२५५०१५००, ०२०२५५०१५०२ Email : gwo@punecorportion.org

जावक क्र. : GWO/6654
दिनांक : 08/03/2021

**कोविड-१९ सूक्ष्म प्रतिबंधित क्षेत्र आदेश**

विषय : कोरोना विषाणू (कोविड-१९) आजाराच्या अनुषंगाने प्रतिबंधित क्षेत्र (Micro Containment Zone) सूक्ष्म प्रतिबंधित क्षेत्र घोषित करणेबाबत.

संदर्भ : १) साथरोग अधिनियम १८९७ ची अंमलबजावणी सुरु झाल्याबाबतची अधिसूचना दि.१३.०३.२०२०.
२) महाराष्ट्र कोविड १९ उपाययोजना नियम, २०२०.
३) केंद्रीय आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५.
४) सार्वजनिक आरोग्य विभाग , मंत्रालय, मुंबई यांचेकडील अधिसूचना क्र. कोरोना-२०२०/५८ आरोग्य ५ दि. १३.०३.२०२०.

माहे फेब्रुवारीच्या प्रथम सप्ताहापासून (कोव्हिड-१९) च्या रुग्ण वाढीचा दर वाढलेला असून त्यामुळे कोरोना विषाणूची दुसरी लाट येण्याची शक्यता नाकारता येत नाही. सद्यस्थितीमध्ये शिवाजीनगर-घोलेरोड क्षेत्रिय कार्यालयाच्या कार्यक्षेत्रातील खालील ठिकाणी कोव्हिड-१९ विषाणूचा संसर्ग वाढत असल्याने रुग्ण आढळून येत आहे.

| अ.क्र. | क्षेत्रिय कार्यालयाचे नाव | प्रभाग क्र. | सूक्ष्म प्रतिबंधित क्षेत्राचे नाव | कालावधी |
|---|---|---|---|---|
| १. | शिवाजीनगर-घोलेरोड क्षेत्रिय कार्यालय | ७ | राजप्रसाद सोसायटी, ICS कॉलनी भोसलेनगर, पुणे ४११ ००३. | दि. ०८/०३/२०२१ ते २१/०३/२०२१ |

तरी कोरोना विषाणू प्रतिबंधात्मक उपाययोजनेसाठी सदरचा परिसर हा (Micro Containment Zone) सूक्ष्म प्रतिबंधित क्षेत्र म्हणून घोषित करण्यात येत आहे. वरील परिसर व त्याच्या आजूबाजूच्या परिसरात राहणा-या नागरिकांनी खालील सूचनांचे पालन करणे आवश्यक आहे.

१. सोसायटी / घर / बंगला / चाळ/ ऑफिस इ. ठिकाणी राहणा-या नागरिकांनी/काम करणा-या कर्मचा-यांनी त्यांच्या आवारात/ घरी / ऑफिस मध्ये भेट देणा-या प्रत्येक व्यक्तीचे पल्स ऑक्सिमीटर आणि थर्मल डिटेक्टरच्या सहाय्याने तपासणी केली जावी. कोव्हिडसाठी पल्स ऑक्सिमीटर तपासणी ही दिशादर्शक आहे. ज्या व्यक्तीची ओ-२ सॅच्युरेशन लेव्हल ही ९४ च्या खाली असल्यास त्यास त्वरीत पुढील तपासणी करिता महापालिकेची रुग्णालये अथवा खाजगी डॉक्टर यांचेमार्फत तपासणी करुन घेणेबाबतची सूचना देण्यात यावी.

Scanned with CamScanner

२. सोसायटी / घर / बंगला / चाळ/ ऑफिस इ. ठिकाणी राहणा-या / काम करणा-या ज्येष्ठ व्यक्ती/१० वर्षाखालील मुले / आजाराने ग्रस्त असलेल्या व्यक्ती यांची पल्स ऑक्सिमीटर व्दारे तपासणी करुन त्यांची नोंद ठेवण्यात यावी. या अनुषंगाने ज्या व्यक्तींची ओ-२ सॅच्युरेशन लेव्हल ही ९४ किंवा त्या खाली आल्यास अशा व्यक्तींची डॉक्टरांच्या सल्ल्याने तात्काळ स्वॅब टेस्ट करुन घेण्यात यावी. स्वॅब टेस्ट करणेकरिता शिवाजीनगर-घोलेरोड क्षेत्रिय कार्यालयामार्फत सावित्रीबाई फुले स्वॅब सेंटर, गोखलेनगर या ठिकाणी मोफत सोय उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. याबाबत अधिक माहिती आवश्यक असल्यास आपण आपले परिसरातील आरोग्य निरीक्षक यांचेशी संपर्क साधावा.

३. आपले सोसायटी / घर / बंगला / चाळ / ऑफिस इ. ठिकाणी कोव्हीड १९ व्यतिरिक्त इतर आजारांकरिता रुग्णालयात दाखल असणाऱ्या रुग्णांबाबतची माहिती कृपया gwo@punecorportion.org या ईमेल वर उपलब्ध करून द्यावी जेणेकरून केवळ कोव्हीड १९ चे अनुषंगाने माहितीचे विश्लेषण करून वैद्यकीय विभागामार्फत पुढील मदत उपलब्ध करून देता येईल.

४. सोसायटी / घर / बंगला / चाळ / ऑफिस इ. ठिकाणी सोशल डिस्टन्सिंग चे पालन केले जाईल व प्रत्येक व्यक्ती मास्कचा वापर करेल याबाबतची दक्षता घ्यावी.

तरी वरील सूचनांचे तंतोतंत पालन करावे.

( आशा राऊत )
महापालिका सहाय्यक आयुक्त
तथा सनियंत्रण अधिकारी
शिवाजीनगर घोलेरोड क्षेत्रिय कार्यालय
पुणे महानगरपालिका

प्रत माहितीस्तव व पुढील कार्यवाहीसाठी......

१) मा. अतिरिक्त महापालिका आयुक्त (ज) पुणे महानगरपालिका
२) मा.सहाय्यक आरोग्य प्रमुख, पुणे महानगरपालिका
३) मा.उप आयुक्त परिमंडळ क्र.२, पुणे महानगरपालिका
४) समन्वयक, डी.पी.सेल, पुणे महानगरपालिका
५ )मा. वरिष्ठ पोलिस निरीक्षक, चतु:श्रृंगी पोलिस स्टेशन ,पुणे.
६) मा. वरिष्ठ पोलिस निरीक्षक, खडकी पोलिस स्टेशन ,पुणे.
७) संबंधित आरोग्य निरीक्षक

Scanned with CamScanner